SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004 MAHARASHTRA
PHONE: EPBX - 2609000 FAX:0091-0231-2691533 & 0091-0231-692333
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४ महाराष्ट्र
दूरध्वनी ईपीबीएक्स- २६०९००० संलग्नता टी-२ विभाग दूरध्वनी -०२३१ - २६०९०९१संचालक,बी.सी.यु.डी. कार्यालय, दूरध्वनी : (थेट) ०२३१ - २६०९०७०
Estd : 1962
NAAC 'A++' Grade
Accerediteed by NAAAC (2021)
With CGPA3.52

जा.क्र. संलग्नता/टी-२/परिपत्रक/ दि. 13 JUL 2022

№ 0 0 0 9 9

# परिपत्रक

**तात्काळ/महत्वाचे**

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नीत महाविद्यालये,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**विषय:-** विधानपरिषद तारांकित प्रश्न क्र. १३९३९ (राज्यातील उच्च शिक्षण संस्थांकडे असलेली अनामत रक्कत ईबीसी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वापराकरीता देण्याबाबत...)

**संदर्भ:-** मा. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांचे जा.क्र. विससं/उशि/कोवि/२०२०/३५९२, दि.०७/०७/२०२२ रोजीचे पत्र

महोदय/महोदया,

उपरोक्त विषय संदर्भांकित पत्रास अनुसरून राज्यातील उच्च शिक्षण संस्थांकडे असलेली अनामत रक्कम ईबीसी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वापराकरीता देण्याबाबत विधानपरिषद तारांकित प्रश्न क्र. १३९३९ च्या अनुषंगाने माहिती मागविण्यात आली आहे.

सदर माहितीचे अनुषंगाने गुगल फॉर्म तयार करण्यात आला आहे त्याची लिंक खालील प्रमाणे असून सदर लिंक वर जाऊन तात्काळ माहिती भरण्यात यावी.

Google Form Link-
https://docs.google.com/forms/d/e/१FAIpQLSepWh_IOvZyuL४aycfJXvXGpp०fCAIYUW०PTr१ESuK-MWUPxg/viewform?usp=sf_link

सदर माहिती शासनास तात्काळ पाठविण्याची असल्याने महाविद्यालयांनी **दि. १४/०७/२०२२ रोजी दुपारी ४.०० पूर्वी तात्काळ कार्यवाही करावी,** हि विनंती.

आदेशान्वये

श्री. विलास एस. सोयम
उपकुलसचिव
संलग्नता टी-२ विभाग

सोबत- वरीलप्रमाणे

# महाराष्ट्र शासन

## विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर

राजाराम महाविद्यालय परिसर, विद्यानगर, कोल्हापूर -४१६ ००४

E-mail: jdhekop@gmail.com

फोन क्र. : (०२३१) २५३५४००, २५३५४५४ फॅक्स : (०२३१) २५३५४००


जा.क्र. : विसस/उशि/कोवि/२०२०/ ३५१ दिनांक :- ०३.०६.२०२०

27 JUL 2022

प्रति,
कुलसचिव,
शिवाज विद्यापीठ,
कोल्हापूर

विषय :- विधान परिषद तारांकित प्रश्न क्र. १३९३९
राज्यातील उच्च शिक्षण संस्थांकडे असलेली अनामत रक्कम ईबीसी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वापराकरीता देण्याबाबत

संदर्भ :- संचालनालयाकडील पत्र क्र.उशिसं/विप्रताप्रक्र.१९३९/मवि-१/२०२२/७४६४ / दि.०७.०७.२०२२

उपरोक्त विषयाबाबत संदर्भांकित पत्राची प्रत सोबत जोडली आहे, कृपया अवलोकन करावे.

संदर्भांकित पत्रातील प्रश्नांबाबत प्रश्नोत्तरे व पुरक टिपणी आपल्या सविस्तर अभिप्रायासह आजच, उलटटपाली या कार्यालयाच्या jdhekop@gmail.com या ईमेल आय.डी वर सादर करावी.

विधान मंडळ कामकाजाचे महत्व व गांभिर्य विचारात घेऊन कृपया प्रथम प्राधान्याने कार्यवाही करावी.

( डॉ. हेमंत ना.कठरे ),
विभागीय सहसंचालक, (उ.शि.),
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर.

प्रत :- मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे

६३२ । विधि ५
५/७/२०२२

क्रमांक - ______ / ई-१
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई/नागपूर
दिनांक : ०१-०७-२०२२

प्रति,
सचिव
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

महोदय,

माननीय सभापतींनी खाली उद्धृत केलेला विधानपरिषद तारांकित प्रश्न स्वीकृत केला आहे. त्या प्रश्नाचे उत्तर देण्यासंबंधी माहिती पुढीलप्रमाणे आहे -
प्रश्नाचा गट क्रमांक: ४
प्रश्नाच्या उत्तराचा दिनांक: २८-०७-२०२२
प्रश्नोत्तराच्या तीन प्रती या सचिवालयाला मिळण्याचा शेवटचा दिनांक: २०-०७-२०२२

प्रत माहितीसाठी सादर अग्रेषित -
(१) माननीय मुख्यमंत्री
(२) माननीय उच्च व तंत्र शिक्षण मंत्री
(३) सर्व संबंधित सदस्यांना

आपला

प्रधान सचिव
महाराष्ट्र विधानपरिषद

---

राज्यातील उच्च शिक्षण संस्थांकडे असलेली अमानत रक्कम ईबीसी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वापराकरिता देण्याबाबत

*१३९३९ श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, ॲड. निरंजन डावखरे, श्री. रमेशदादा पाटील, श्री. नागोराव गाणार, श्री. रमेश कराड, श्री. अरुण लाड, श्री. प्रवीण दटके, श्री. प्रविण दरेकर, डॉ. परिणय फुके

सन्माननीय उच्च व तंत्र शिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विद्यापीठांशी सलंग्नित असणारी महाविद्यालये विद्यार्थ्यांकडून पदविका, पदवी किंवा पदव्युत्तर अभ्यासक्रमाला प्रवेश घेताना शैक्षणिक शुल्कासह वस्तीगृह, भोजन, शैक्षणिक साहित्य, ग्रंथालय आणि इतर सुविधांसाठी 500 रुपयापासून अनामत रकना जमा करतात, परंतु सदरहू रक्कम अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर शासन निर्णयानुसार शासकीय महाविद्यालयांनी संबंधित विभागाकडे तसेच खाजगी महाविद्यालयांनी विद्यार्थी कल्याण विभागाकडे जमा करणे बंधनकारक असताना सुमारे पाचशे कोटींहून अधिक रक्कम महाविद्यालयाकडे पडून असल्याचे कॉप्स (केअर ऑफ पब्लिक सेफ्टी) संघटनेचे पदाधिकारी अमर एकाड यांनी माहे एप्रिल, २०२२ रोजी च्या सुमारास निदर्शनास आणले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अनेक महाविद्यालये ही रक्कम विद्यार्थ्यांना परत देत नसल्यामुळे राज्यातील उच्च शिक्षण देणाऱ्या ५४ महाविद्यालयांकडे १४ कोटी रुपये तर तंत्रशिक्षण विभागांतर्गत महाविद्यालयाकडे १२ कोटी इतकी अनामत म्हणून घेतलेली रक्कम महाविद्यालयांकडे पडून असल्याचे दिनांक २२ एप्रिल, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच सदरहू अनामत रक्कमेचा वापर व्हावा यापार्श्वभूमीवर सदरहू रक्कम ईबीसी विद्यार्थ्यांच्या विविध गरजांसाठी वापरण्यात यावी अशी मागणी त्यांनी उच्च व तंत्रशिक्षण संचालकांना केली असून ईबीसी विद्यार्थ्यांना त्यांच्या शिक्षणात आर्थिक मदत अनेकदा अपुरी पडत असल्याने महाविद्यालयाकडे असणारी रक्कम ईबीसी विद्यार्थ्यांच्या आवश्यक गरजांसाठी खर्च केल्यास त्यांना शैक्षणिक सहाय्य मिळेल अशी अपेक्षा विद्यार्थ्यांकडून व्यक्त होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शैक्षणिक शुल्कासह विविध कारणासाठी महाविद्यालयाकडून रक्कम आकारली जाते परंतु विद्यार्थी सदरहू सेवेचा लाभ घेतात की नाही याची कुठलीही शहानिशा न करता सरसकट शुल्क आकारले जात असून विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निर्देशानुसार सदरहू अनामत रक्कम परत करणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन ईबीसी विद्यार्थ्यांना त्यांच्या शिक्षणात आर्थिक मदतीकरिता सदरची अनामत रक्कम वापराकरिता देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?